## L. A. BILL No. XVIII OF 2021.

A BILL

TO AMEND THE FARMERS' PRODUCE TRADE AND COMMERCE (PROMOTION AND FACILITATION) ACT, 2020, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८.

**शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२०, हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

२०२१ चा २१.

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२० (यात यापुढे ज्याचा निर्देश “ मुख्य अधिनियम ” असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, याच्या कलम १ मधील पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— २०२० चा २१.

“ (२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल. ”.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(१) खंड (क) च्या आधी, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील :—

“ (१क) “ अपील प्राधिकारी ” याचा अर्थ, कलम ८ च्या पोट-कलम (४) अन्वये नियुक्त केलेला अपील प्राधिकारी, असा आहे ;

(२क) “ सक्षम प्राधिकारी ” याचा अर्थ, कलम ४ च्या पोट-कलम (१क) मध्ये विनिर्दिष्ट केलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे ; ” ;

(२) खंड (च) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

“ (च-१) “ महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियम ” याचा अर्थ, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३, असा आहे ; ” ; १९६४ चा महा. २०.

(३) खंड (झ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

“ (झ) “ विहित ” याचा अर्थ, या अधिनियमान्वये राज्य शासनाने करावयाच्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे ; ”.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

“ (१) कोणताही व्यापारी, व्यापार क्षेत्रामध्ये, शेतकऱ्यासोबत किंवा दुसऱ्या व्यापाऱ्यासोबत अनुसूचित शेतकरी उत्पन्नाचा आंतर-राज्यीय व्यापार किंवा राज्यांतर्गत व्यापार करील.

(१क) अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यापाऱ्याकडे विहित करण्यात येईल असे सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध लायसन असल्याखेरीज, तो, अनुसूचित शेतकरी उत्पन्नाचा व्यापार करणार नाही :

परंतु महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमाच्या कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या बाजाराबाहेर, कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ५घ मध्ये केलेली तरतूद वगळता, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमाच्या अनुसूचीतील बाबी **सात**-फळे, **आठ**-भाजीपाला यांच्या सर्व नोंदीमध्ये आणि बाब-**दहा** व्यंजने, मसाले व इतर पदार्थ याच्या नोंदी (२), (३), (४) आणि (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाचे पणन करण्यासाठी, कोणत्याही लायसनची किंवा परवानगीची आवश्यकता असणार नाही, आणि या कलमाअन्वये त्याचे विनियमन करण्यात येणार नाही.

(१ख) पोट-कलम (१क) अन्वये अर्ज करण्याची आणि लायसन देण्याची रीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल. ”.

सन २०२० चा अधिनियम क्रमांक २१ मध्ये कलम ८ बदली दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

विवाद निवारण यंत्रणा.

“ ८. (१) कलम ४ खालील शेतकरी आणि व्यापारी यांच्यामधील व्यवहारातून उद्भवणाऱ्या कोणत्याही विवादाच्या बाबतीत, पक्षकारांना सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करून, त्याचे निरसन करून, घेता येईल.

(२) सक्षम प्राधिकारी, स्वतः होऊन किंवा शेतकऱ्याकडून अर्ज आल्यावर किंवा कोणत्याही शासकीय अभिकरणाकडील संदर्भावर, कलम ४ च्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदीच्या उल्लंघनाची दखल घेईल आणि पोट-कलम (३) अन्वये कारवाई करील.

(३) सक्षम प्राधिकारी, विवादावर किंवा या कलमाखालील उल्लंघनावर, तो दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संक्षिप्त रीतीने निर्णय देईल आणि पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर त्यास,—

(क) विवादाअंतर्गत रकमेची वसुली करण्यासाठी आदेश काढता येईल ; किंवा

(ख) कलम ११ च्या पोट-कलम (१) मध्ये कराराविनिर्दिष्ट केलेली शास्ती लादता येईल ; किंवा

(ग) त्यास योग्य वाटेल अशा कालावधीसाठी, विवादास्पद व्यापाऱ्यास या अधिनियमाअन्वये अनुसूचित शेतकरी उत्पन्नाचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही व्यापार किंवा वाणिज्य हाती घेण्यापासून, परिरुद्ध करणारा आदेश काढता येईल.

(४) सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही पक्षकारास, अशा आदेशापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करता येईल. तो, असे अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अपील निकालात काढील.

(५) या कलमाअन्वये अपील प्राधिकाऱ्याचा प्रत्येक आदेश हा दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे अंमलात असेल आणि तो, अशा प्रकारे अंमलबजावणीयोग्य असेल आणि हुकूमनाम्याची रक्कम ही जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(६) सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करण्याची आणि अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करण्याची रीत व कार्यपद्धती ही विहित करण्यात येईल, त्याप्रमाणे असेल. ".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २०२० चा अधिनियम क्रमांक २१ मध्ये नवीन कलम १६क समाविष्ट करणे.

"**१६क.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणताही व्यापारी शेतकऱ्याची छळवणूक करीत असेल आणि, असा व्यापारी शेतकऱ्याच्या छळवणुकीच्या अपराधासाठी दोषी ठरला तर तो, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा पाच लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल. शेतकऱ्याच्या छळवणुकीसाठी शिक्षा.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनासाठी, कराराच्या अटींनुसार किंवा मालाची पोचवणी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, यांपैकी जे अगोदर घडेल ते, व्यापाऱ्याने शेतकऱ्याला रक्कम दिली नाही, तर त्याने छळवणुकीचा अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.".

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २०२० चा अधिनियम क्रमांक २१ मध्ये नवीन कलम १८क समाविष्ट करणे.

"**१८क.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य

विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

शेतकरी उत्पन्नांची विक्री व खरेदी यांच्याशी संबंधित निवडीचे स्वातंत्र्य शेतकरी व व्यापारी उपभोगू शकतील अशा पर्यायी व्यापारी माध्यमांमार्फत किफायतशीर किंमतीची सुविधा पुरविणाऱ्या एका परिसंस्थेच्या निर्मितीसाठी तरतूद करण्यासाठी ; बाजारांच्या किंवा विविध राज्य कृषि उत्पन्न बाजार विधिविधानांन्वये अधिसूचित केलेल्या मानीव बाजारांच्या प्रत्यक्ष जागेबाहेर शेतकऱ्यांच्या उत्पन्नांचा सक्षम, पारदर्शी व विनाअडथळा आंतरराज्यीय व्यापार व राज्यांतर्गत व्यापार आणि वाणिज्य याचे प्रचालन करण्यासाठी ; इलेक्ट्रॉनिक व्यापारासाठीच्या सुलभ आराखड्याची तरतूद करण्यासाठी संसदेने, शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२० (२०२० चा केंद्रीय अधिनियम क्रमांक २१), (यात यापुढे ज्याचा निर्देश "केंद्रीय अधिनियम" असा करण्यात आला आहे) अधिनियमित केला आहे.

२. केंद्रीय अधिनियमामध्ये, व्यापार क्षेत्रातील व्यापारासाठी व्यापाऱ्याकडे स्थायी लेखा क्रमांक (पॅन) असावा अशी शर्त आहे. व्यापार क्षेत्रामध्ये व्यापारासाठी लायसनची तरतूद नाही. शेतकऱ्याला कृषि उत्पादनाची रक्कम प्रदान करण्यात कसूर केल्याबाबत व्यापाऱ्यावर कोणतेही नियंत्रण नाही. कलम ८ मध्ये शेतकऱ्यांसाठी विवाद निवारण यंत्रणेची तरतूद आहे. उक्त कलमामध्ये, शेतकरी आणि व्यापारी यांच्यामधील विवादांचे निवारण करण्यासाठी, उप-विभागीय दंडाधिकारी हा सक्षम प्राधिकारी आहे आणि जिल्हाधिकारी हा अपील प्राधिकारी आहे. उप विभागीय दंडाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांसारख्या महसूल प्राधिकाऱ्यांवरील कामाचा भार विचारात घेता, करारनिविष्ट वेळेच्या आत शेतकरी व व्यापारी यांच्यामधील विवादांचे निवारण करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ देणे शक्य होणार नाही.

३. शेतकऱ्याला वेळेच्या आत त्याच्या कृषि उत्पन्नाची किंमत मिळेल याची खात्री करण्यासाठी आणि परिणामकारकरीत्या शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनास, शेतकऱ्यांचे उत्पन्न, व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात सुधारणा करणे इष्ट वाटते. या विधेयकामध्ये पुढील सुधारणा प्रस्तावित आहेत,—

(क) कलम ४ मधील, पोट-कलम (१क) मध्ये असे प्रस्तावित केले आहे की, अशा व्यापाऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध लायसन असल्याखेरीज तो अनुसूचित शेतकरी उत्पन्नाचा व्यापार करणार नाही ;

(ख) महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमाच्या कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या बाजाराबाहेर कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ५घ मध्ये केलेली तरतूद वगळता, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियमाच्या अनुसूचीतील बाबी **सात**-फळे, **आठ**-भाजीपाला, यांच्या सर्व नोंदीमध्ये आणि बाब **दहा**-व्यंजने, मसाले व इतर पदार्थ यांच्या नोंदी (२), (३), (४) आणि (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाचे पणन करण्यासाठी, कोणत्याही लायसनची किंवा परवानगीची आवश्यकता असणार नाही ;

(ग) कलम ४ अन्वये, शेतकरी व एखाद्या व्यापाऱ्यामध्ये एखाद्या व्यवहारात उद्भवणाऱ्या कोणत्याही विवादाच्या बाबतीत पक्षकारांना विवाद निर्णयासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करता येईल आणि सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल ;

(घ) शेतकऱ्यांच्या छळवणुकीसाठी तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कारावासाची किंवा पाच लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्हीही शिक्षेची तरतूद देखील केली आहे ;

(ङ) नियम करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारासाठी देखील तरतूद केली आहे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **बाळासाहेब पाटील,**

दिनांक ६ जुलै २०२१. पणन मंत्री.

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.**

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव या विधेयकात अंतर्भूत आहेत :—

**खंड १(३).—**या खंडान्वये, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २.—**या खंडान्वये, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२०, याच्या तरतुदी अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४.—**मुख्य अधिनियमाच्या कलम ४ चे पोट-कलम (१) बदली दाखल करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये,—

(क) पोट-कलम (१-क) मध्ये, अधिनियमाच्या प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकारी विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ख) पोट-कलम (१ख) मध्ये, पोट-कलम (१क) अन्वये अर्ज करण्याची व लायसन देण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५.—**मुख्य अधिनियमाचे कलम ८ बदली दाखल करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये,—

(क) पोट-कलम (४) मध्ये, सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या पक्षकाराकडून अपील दाखल करण्यासाठी अपील प्राधिकारी विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ख) पोट-कलम (६) मध्ये, सक्षम प्राधिकाऱ्यासमोर अर्ज आणि अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करण्याची रीत व कार्यपद्धती विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७.—**मुख्य अधिनियमामध्ये कलम १८क समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, पोट-कलम (१) मध्ये, उक्त अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८(१).—**या खंडान्वये, अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास ती दूर करण्यासाठी **राजपत्रात** आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे उपरोल्लिखित प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहे.

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक १८ शेतकरी मालाचा व्यापार व वाणिज्य (प्रचलन व सुलभीकरण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट

**[ शेतकरी मालाचा व्यापार व वाणिज्य (प्रचलन व सुलभीकरण) अधिनियम, २०२० यातील उतारे ]**

**(सन २०२० चा अधिनियम क्रमांक २१)**

**१.** (१) * * * *

(२) तो, दिनांक ५ जून, २०२० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) ते (ज) * * * *

(झ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केंद्र सरकारने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

**३.** * * * *

अनुसूचित शेतकरी मालाचा व्यापार व वाणिज्य.

**४.** (१) कोणत्याही व्यापाऱ्यास, एखाद्या शेतकऱ्याच्या किंवा एखाद्या व्यापर क्षेत्रातील दुसऱ्या एखाद्या व्यापाऱ्याच्या साथीने अनुसूचित शेतकरी मालाचा आंतर-राज्यीय व्यापर किंवा राज्यांतर्गत व्यापार करता यईल :

परंतु, शेतकरी उत्पादक संघटना किंवा शेतकरी सहकारी संस्था यांखेरीज, एखाद्या व्यापाऱ्याला आयकर अधिनियम, १९६१ अन्वये स्थायी खाते क्रमांक नेमून दिलेला नसेल किंवा त्याच्याकडे, केंद्र सरकारकडून अधिसूचित करण्यात येईल असा इतर दस्तऐवज नसेल तर, असा कोणताही व्यापारी, कोणत्याही अनुसूचित शेतकरी मलालाचा व्यापार करणार नाही.

**(२)** व **(३)** * * * *

**५.** ते **७.** * * * *

शेतकरी विवाद निवारण यंत्रणा.

**८.** (१) कलम ४ अन्वये शेतकरी आणि एखादा व्यापारी यांच्यामधील एखाद्या संव्यवहारातून कोणताही विवाद उद्‌भवल्यास, त्या पक्षकारांना उप विभागीय दंडाधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करून समेटाद्वारे परस्पर स्वीकार्य असा तोडगा काढण्याचा प्रयत्न करता येईल. असा उप विभागीय दंडाधिकारी, त्या विवादाचा बंधनकारक असा समझोता सुलभ करण्यासाठी, त्याच्याकडून नियुक्त करावयाच्या एखाद्या समेट मंडळाकडे असा विवाद निर्देशित करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये उप विभागीय दंडाधिकाऱ्याकडून नियुक्त करण्यात येणारे प्रत्येक समेट मंडळ हे, एक अध्यक्ष आणि उप विभागीय दंडाधिकाऱ्यास योग्य वाटतील असे कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त चार सदस्य मिळून बनलेले असेल.

(३) अध्यक्ष हा, उप विभागीय दंडाधिकाऱ्याचे पर्यवेक्षण व नियंत्रण याखालील सेवेत असलेला एक अधिकारी असेल आणि इतर सदस्य हे, त्या विवादातील पक्षकारांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सम संख्येत नियुक्त केलेल्या व्यक्ती असतील, आणि एखाद्या पक्षकाराचे प्रतिनीधीत्व करण्यासाठी नियुक्त करण्यात येणारी कोणतीही व्यक्ती ही, त्या पक्षकाराच्या शिफारशीवरून नियुक्त करण्यात येईल :

परंतु, कोणताही पक्षकार सात दिवसांच्या आत अशी शिफारस करण्यात कसूर करील तर, उप विभागीय दंडाधिकारी त्या पक्षकाराचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींची नियुक्ती करील.

(४) कोणत्याही विवादाच्या बाबतीत, समेट कार्यवाहीच्या ओघात एखादा समझोता निर्णयाप्रत येईल त्या बाबतीत, तद्‌नुसार समझोतापत्राचा एक मसुदा तयार करण्यात येईल आणि त्यावर अशा विवादातील पक्षकारांकडून स्वाक्षरी करण्यात येईल. असा समझोता त्या पक्षकारांवर बंधनकारक असेल.

(५) पोट-कलम (१) खालील संव्यवहारातील पक्षकार या कलमान्वये घालून दिलेल्या रीतीने तीस दिसांच्या आत विवाद मिटवण्यास असमर्थ असतील तर, त्यांना संबंधित उप विभागीय दंडाधिकाऱ्याकडे जाता येईल. तो, अशा विवादाचा समझोता करण्यासाठी " उप विभागीय प्राधिकारी " असेल.

(६) उप विभागीय प्राधिकारी, स्वतःहून किंवा कोणत्याही शासकीय अभिकरणाकडील एखाद्या विनंती अर्जावरून किंवा निर्देशावरून, कलम ४ च्या तरतुदींच्या किंवा त्यांखाली केलेल्या नियमांच्या उल्लंघनाची दखल घेईल आणि पोट-कलम (७) अन्वये कार्यवाही करील.

(७) उप विभागीय प्राधिकारी या कलमाखालील विवादावर किंवा उल्लंघनावर, तो विवाद दाखल केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत संक्षिप्त रीतीने निर्णय करील आणि त्या पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यास,—

(क) विवादीत रक्कम वसूल करण्याचा आदेश देता येईल ; किंवा

(ख) कलम ११ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शास्ती लादता येईल ; किंवा त्यास योग्य वाटेल अशा कालावधीकरिता, या अधिनियमान्वये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अनुसूचित शेतकरी मालाचा कोणताही व्यापार व वाणिज्य हाती घेण्यापासून परिरोधित करण्यासाठी आदेश देता येईल.

(८) उप विभागीय प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही पक्षकारास, असा आदेश दिल्यापासून तीस दिवसांच्या आत अपील प्राधिकाऱ्यापुढे (जिल्हाधिकाऱ्यापुढे किंवा जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या अपर जिल्हाधिकाऱ्याकडे) अपील दाखल करता येईल, तो असे अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत ते अपील निकालात काढील.

(९) या कलमाखालील उप विभागीय प्राधिकाऱ्याच्या किंवा अपील प्राधिकाऱ्याच्या प्रत्येक आदेशाचा, एखाद्या दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याइतकाच प्रभाव असेल आणि तो, अशा हुकूमनाम्याप्रमाणेच अंमलबजावणीयोग्य असेल, आणि निवाडा केलेली रक्कम ही, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

(१०) उप विभागीय प्राधिकाऱ्यापुढे एखादा विनंती अर्ज किंवा अर्ज आणि अपील प्राधिकाऱ्यापुढे अपील दाखल करण्याची रीत आणि कार्यपद्धती ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**९.** ते **२०.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८.]**

**[शेतकरी उत्पन्न व्यापर व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. बाळासाहेब पाटील,**
पणन मंत्री.]

**श्री. राजेन्द्र भागवत**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई